2 JUN 2018 Times of India जनसंपर्क कक्ष शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# SUK doubles fellowship amount to ₹10k

TIMES NEWS NETWORK

**Kolhapur:** Shivaji University, Kolhapur's (SUK) increased fellowship will be available to research scholars from the academic year 2018-19.

In a circular on June 1, the SUK officials have stated that the university has increased its golden jubilee research fellowship amount from Rs 5,000 to Rs 10,000 and it will be available for the eligible fellows.

A decision regarding the same was taken at the management council meeting on April 27.

The scholarship, which was called departmental research fellowship, has been renamed as Shivaji University Golden Jubilee Research Fellowship. It is offered from the university funds.

Along with the scholarship, students will also get an increased annual expense of Rs 10,000 for books and stationery.

The university is offering the fellowship from 1995 to select students from each department.

The SUK has 38 departments and the departmental selection committee scrutinizes the applications from the PhD research scholars every year.

The fellowship is offered for two years and can be extended for another year if the performance of the candidate found to be satisfactory and the candidate gets recommendation from the departmental selection committee.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
2 JUN 2018
सकाळ

# ओंकार गुरवची लष्करी सेवेत निवड



ओंकार गुरव

कोल्हापूर, ता. १ : केंद्रीय लोकसेवा आयोगातर्फे घेण्यात आलेल्या एकात्मिक लष्करी सेवा (कम्बाईड डिफेन्स सर्व्हिस) परीक्षेत शिवाजी विद्यापीठाचा विद्यार्थी ओंकार अनंत गुरव याने यश मिळविले. त्याची लष्करी सेवेत निवड झाली. केंद्रीय लोकसेवा आयोगातर्फे (यूपीएससी) २०१७ मध्ये परीक्षा झाली. त्यात ओंकारने ९७ वा क्रमांक मिळवून इंडियन मिलिटरी अॅकॅडमीत (आयएमए) स्थान पक्के केले. डेहराडून येथील दीड वर्षाच्या प्रशिक्षणानंतर ओंकार गुरव भारतीय लष्करात लेफ्टनंट पदावर रुजू होईल. तो मूळचा हसुरसासगिरी (ता. गडहिंग्लज) येथील असून, विद्यापीठाच्या डिपार्टमेंट ऑफ टेक्नॉलॉजी येथे संगणक अभियांत्रिकीच्या अंतिम वर्षात आहे. त्याचे प्राथमिक शिक्षण पिंपरी येथील जयहिंद विद्यालय व एसएनबीपी स्कूलमध्ये झाले. ओंकारची आई माधवी गुरव पुण्यात स्टेट बँक ऑफ इंडिया शाखेत व्यवस्थापकपदी, तर वडील डॉ. अनंत गुरव पत्रकार आहेत.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
2 JUN 2018
तरूण भारत

# 'विवेकानंद'चा शिवाजी विद्यापीठाशी सामंजस्य करार

**कोल्हापूर :** विवेकानंद कॉलेजमधील मराठी विभाग व शिवाजी विद्यापीठ मराठी शिक्षक संघामध्ये नुकताच सामंजस्य करार पार पडला. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस. वाय. होनगेकर यांच्या अध्यक्षतेखाली सामंजस्य करार संपन्न झाला.

**महाविद्यालयातर्फे विद्यार्थीभिमुख उपक्रम राबविले जाणार**

या कराराच्या माध्यमातून विवेकानंद महाविद्यालय व शिवाजी विद्यापीठ मराठी शिक्षक संघातील स्नेहपूर्ण नात्याचीविण अधिक घट्ट होईल. या करारामुळे विविध विद्यार्थीभिमुख उपक्रम राबविले जातील अशी ग्वाही विवेकानंद महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस. वाय. होनगेकर यांनी दिली. याप्रसंगी सेवानिवृत्तीचे औचित्य साधून शिवाजी विद्यापीठ मराठी शिक्षक संघाच्या वतीने प्रा. डॉ. डी. ए. देसाई यांचा गौरव करण्यात आला. प्रा. डॉ. डी. ए. देसाई यांनी प्रास्ताविकामध्ये संघाच्या स्थापनेपासून आत्तापर्यंतचा कार्याचा आढावा घेतला. आभार प्रा. डॉ. चंद्रकांत पोतदार यांनी केले. यावेळी महाविद्यालयाचे सहाय्यक ग्रंथपाल हितेंद्र साळुंखे उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
2 JUN 2018
तरुण भारत

# अभियांत्रिकी प्रवेश प्रक्रिया कार्यशाळा उद्या

**कोल्हापूर :** द ईन्स्टिट्यूशन ऑफ इंजीनीअर्स (इंडिया) कोल्हापूर लोकल सेंटर व शिवाजी विद्यापीठाचे तंत्रज्ञान विभाग यांच्या संयुक्त विद्यमानाने अभियांत्रिकी प्रथम वर्ष व थेट द्वितीय वर्ष पदवी प्रवेश प्रक्रिया व करियर संबंधी बाबत मार्गदर्शन कार्यशाळेचे आयोजन केले आहे. उद्या (रविवार) संगितसूर्य केशवराव भोसले नाट्यगृह कोल्हापूर येथे दुपारी ३ वाजता हि कार्यशाळा होणार असून कार्यशाळेमध्ये तंत्रज्ञान विभागाचे संचालक डॉ. प्रा.जयदीप बागी व प्राध्यापक विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करणार आहेत.

अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेच्या अखत्यारीत असलेल्या प्रथम वर्ष व थेट द्वितीय वर्ष अभियांत्रिकी पदवी प्रवेश प्रक्रिया ही केंद्रीय प्रवेश पद्धतीने केली जाते. त्यामुळे ही प्रवेश प्रक्रिया अभियांत्रिकी इच्छुक विद्यार्थी व पालक यांना सविस्तर समजवून घेणे महत्वाचे असते. कार्यशाळेच्या माध्यमातून प्रवेश प्रक्रियेतील नियम, ऑनलाईन नाव नोंदणी करण्याची प्रक्रीया, शाखा निवड पसंती ठरवणे, पसंती क्रम देताना घ्यावयाची काळजी, फी सवलत, आवश्यक कागदपत्रे यांची माहिती देण्यात येणार आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
2 JUN 2018
सकाळ

# विद्यापीठात कार्यकर्ता प्रशिक्षण

कोल्हापूर : महिला हक्कांबद्दल बोलताना धर्माचे व जातीचे प्रश्न समजून घ्यायला हवेत, अशी अपेक्षा नितीश नवसागर यांनी आज येथे व्यक्त केली. सातव्या महाराष्ट्र महिला आरोग्य हक्क परिषदेनिमित्त आयोजित कार्यकर्ता प्रशिक्षण कार्यशाळेत ते बोलत होते. शिवाजी विद्यापीठाच्या मानव्यशास्त्र इमारतीमध्ये कार्यशाळेचे आयोजन केले होते. नवसागर म्हणाले, ''कोणताही प्रश्न हा केवळ बाईचा नसतो, तर संपूर्ण समाजाचा असतो. त्यामुळे शोषणाविरोधात काम करताना जातीच्या प्रश्नाला बगल देऊन चालणार नाही.'' हसीना खान यांनी धर्मांधता व दहशतीचे वातावरण याविषयी विचार मांडले. मनीषा गुप्ते यांनी महिलांचे आरोग्य आरोग्यसेवांच्या पलीकडे जाऊन विचारात घेतले पाहिजे, असे सांगितले. या वेळी डॉ. भारती पाटील, मीना शेषू, शैला कुरणे, मेघा पानसरे उपस्थित होत्या.